# विद्यापीठांकडून परीक्षांची औपचारिकता

## बहुतांश विद्यापीठांचा अहवाल सादर; आज निर्णय


**ठिकठिकाणच्या प्रतिनिधींकडून**

**सर्वोच्च न्यायालयाच्या** निकालानंतर राज्यातील विद्यापीठांनी अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याची तयारी सुरू केली असून, बहुतेक विद्यापीठे नावापुरत्याच परीक्षा घेत असल्याचे दिसत आहे. त्यामुळे परीक्षा होणार असल्या तरी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेची पारख होणार का, असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

राज्यातील बहुतेक विद्यापीठांनी परीक्षांबाबतचा अहवाल शासनाला सोमवारी सादर केला आहे. प्राधान्याने ऑनलाइन परीक्षांचा पर्याय बहुतेक विद्यापीठांनी स्वीकारला आहे. मात्र, गरजेनुसार विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष महाविद्यालयात येऊन परीक्षा देण्याची मुभा देण्याची भूमिका विद्यापीठांनी घेतली आहे. विद्यापीठांनी परीक्षा घेण्याची तयारी सुरू केली असली तरी विद्यार्थ्यांच्या कौशल्यांची पारख त्यातून खरेच होणार का असा प्रश्न उपस्थित झाला आहे. बहुपर्यायी प्रश्नपत्रिकांचा पर्याय अमरावती विद्यापीठ वगळता सर्वच विद्यापीठांनी स्वीकारला आहे. मात्र, त्यातही ५० पैकी २५ प्रश्नांचीच उत्तरे देणे, विद्यार्थ्यांना आधीच प्रश्नसंच देणे, परीक्षा घेण्याची, प्रश्नपत्रिका काढण्याची जबाबदारी पूर्णपणे महाविद्यालयांवर सोपवणे अशा पळवाटा विद्यापीठांनी काढल्या आहेत. अनेकांनी २० ते ५० गुण अंतर्गत मूल्यमापनासाठी राखीव ठेवले आहेत.

विद्यापीठांनी सादर केलेल्या अहवालांवर मंगळवारी अंतिम निर्णय जाहीर **(पान २ वर)**

### मुंबई विद्यापीठाचे काय?



- 'प्रात्यक्षिक परीक्षा १५ सप्टेंबरपासून, आधीच्या सत्रातील विषय राहिलेल्या विद्यार्थ्यांची परीक्षा (बॅकलॉग) २५ सप्टेंबरपासून तर नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरू होईल.
- विद्यार्थ्यांना बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नपत्रिका देण्यात येतील. परीक्षा महाविद्यालयाच्या स्तरावर होतील.
- शक्यतो ऑनलाइन परीक्षा घेण्याच्या आणि प्रश्नसंच तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत,' अशी माहिती विद्यापीठातील अधिकाऱ्यांनी दिली.

# अंतिम वर्ष परीक्षा असणार बहुपर्यायी स्वरुपाची

पान १ वरून

त्यानुसार वेळापत्रक ठरवण्यात येणार आहे. या बैठकीला प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमाळकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा नियंत्रक डॉ. गजानन पळसे, विद्यापरिषदेचे ४० सदस्य, अधिष्ठातांसह प्रशासकीय सदस्य ऑनलाईन पद्धतीने सहभागी झाले होते.

## ऑनलाईनसाठी सॉफ्टवेअरचा प्रश्न

ऑनलाईन परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रश्नपत्रिका देणे, त्या तपासणे आणि त्याचे थेट गुण संबंधित शिक्षकांना देणे यासाठी सॉफ्टवेअरचा वापर केला जातो. हे सॉफ्टवेअर शिवाजी विद्यापीठ तसेच पुणे विद्यापीठाकडे उपलब्ध नसल्याची माहिती समोर येत आहे. हे सॉफ्टवेअर विद्यापीठाला कधी व कसे मिळणार याकडे प्रशासनाचे लक्ष लागून राहिले आहे.

## आता प्रतीक्षा वेळापत्रकाची

परीक्षांबाबतचा संभ्रम दूर झाला आहे, वेळापत्रक कधी जाहीर होणार याकडे विद्यार्थ्यांचे लक्ष लागले आहे. ३१ ऑक्टोबरपर्यंत निकाल लावण्याचे आव्हान विद्यापीठ प्रशासनासमोर आहे.

# अंतिम वर्ष परीक्षा असणार बहुपर्यायी स्वरुपाची

## विद्यापीठाच्या विद्यापरिषदेत निर्णय : ऑफलाईन व ऑनलाईन पद्धतीचा अवलंब

प्रतिनिधी
कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाअंतर्गत महाविद्यालयांच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने होणार आहेत. तर प्रश्नपत्रिका वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरुपाची (ऑप्शनल) असेल. सोमवारी विद्यापरिषद बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.



| | |
|---|---|
| अंतिम वर्षाचे एकूण विद्यार्थी | ७५,००० |
| महाविद्यालये | २९३ |
| बॅकलॉगचे विद्यार्थी | २५,००० |
| विषयनिहाय प्रश्नपत्रिका | १६०० |
| विषय | ४७५ |

शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेची बैठक सोमवारी ऑनलाईन पद्धतीने पार पडली. रविवारी अधिष्ठाता मंडळ, अधिकार मंडळ आणि परीक्षा विभागाची बैठक झाली होती. यामध्ये परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यावर एकमत झाले. मात्र या परीक्षा कधी आणि कशाप्रकारे घ्यायच्या याबाबतचा अंतिम निर्णय विद्यापरिषदेच्या बैठकीत होणार होता. त्याप्रमाणे सोमवारी पार पडलेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने होणार आहेत. ही परीक्षा ५० गुणांची असून सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ आणि बहुपर्यायी असणार आहेत. ज्या विषयांची प्रात्यक्षिके झाली आहेत त्यांची ४० गुणांची परीक्षा होईल. १० गुण प्रात्यक्षिकांचे असतील. प्रात्यक्षिक झाले नसलेल्यांची ५० गुणांची परीक्षा होणार आहे. ऑफलाईन परीक्षांचाही पर्याय विद्यार्थ्यांना दिला आहे. यासाठी महाविद्यालये, शाळा तात्पुरत्या ताब्यात घेऊन तेथे परीक्षेची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येणार आहेत. परीक्षांचे वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाणार आहे. ३१ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा होऊन निकाल लावण्याचे आदेश युजीसीकडून दिले आहेत.

पान ६ पहा

### अशी असेल परीक्षा

- प्रात्यक्षिक झालेल्या विषयांना ४० गुण
- ऑफलाईन, ऑनलाईन प्रश्नपत्रिका एकच
- एक तासाचा अवधी, वेळापत्रक लवकरच प्रसिद्ध

# विद्यापीठांकडून परीक्षांची औपचारिकता

(पान १ वरून)

करण्यात येणार असल्याचे उच्चशिक्षण विभागातील अधिकाऱ्यांनी सांगितले.

**श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ**

आमच्या बहुतेक विषयांच्या प्रात्यक्षिक परीक्षा मार्चमध्ये झाल्या होत्या. अंतिम लेखी परीक्षा ऑनलाइन बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेच्या माध्यमातून घेण्यात येईल. एकूण ५० गुणांची परीक्षा असेल. त्यासाठी ३० पैकी २५ प्रश्न विद्यार्थिनींनी सोडवायचे आहेत. प्रत्येक प्रश्नाला दोन गुण असतील. अपवादात्मक स्थितीत काही विद्यार्थिनींना ऑनलाइन परीक्षा देणे शक्य न झाल्यास त्यांना ऑफलाइन परीक्षेचा पर्याय दिला जाईल. सर्व शाखांच्या परीक्षा १ ऑक्टोबरपासून सुरू होतील.

-डॉ. शशिकला वंजारी, कुलगुरू

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर**

अंतिम वर्ष परीक्षांचे नियोजन सुरू आहे. परीक्षांसाठी ऑनलाइन आणि प्रत्यक्ष (ऑफलाइन) अशा दोन्ही पर्यायांचा परिस्थितीनुसार अवलंब करण्यात येईल. बहुपर्यायी स्वरूपाची प्रश्नपत्रिका असतील. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन सुविधा उपलब्ध आहेत, ते ऑनलाइन पद्धतीने परीक्षा देऊ शकतील. ज्या विद्यार्थ्यांना ऑनलाइन सुविधा उपलब्ध नाहीत, ते ऑफलाइन पद्धतीने परीक्षा देऊ शकतील. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर या दोन्ही विद्यापीठांच्या प्रात्यक्षिक परीक्षा १५ ते ३० सप्टेंबर दरम्यान, आधीच्या सत्रातील विषय राहिलेल्या (बॅकलॉग) विद्यार्थ्यांची परीक्षा १ ते ९ ऑक्टोबर आणि अंतिम वर्षाच्या नियमित विद्यार्थ्यांची परीक्षा १० ते ३१ ऑक्टोबर दरम्यान घेण्यात येईल. प्रात्यक्षिक परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष प्रात्यक्षिक करून दाखवावे लागणार नाही, तर प्रयोगवहीचे (जर्नल) गुण, प्रात्यक्षिकाची परीक्षा किंवा तोंडी परीक्षा असे करता येऊ शकते. परीक्षांच्या आयोजन प्रक्रियेत महाविद्यालयांना सहभागी करून घेतले जाणार आहे. परीक्षांसाठी चर्चा, नियोजन सुरू आहे. पुढील तीन ते चार दिवसांमध्ये संपूर्ण आराखडा निश्चित होईल.

-डॉ. नितीन करमळकर, कुलगुरू

**पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ**

अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा येत्या ५ ते ३१ ऑक्टोबर दरम्यान घेण्यात येईल. परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक येत्या दोन दिवसांत विद्यापीठाच्या संकेतस्थळावर जाहीर केले जाईल. महाविद्यालयांना गुगल फॉर्मच्या माध्यमातून विद्यार्थ्यांची माहिती संकलित करण्याची सूचना देण्यात आली आहे. ऑनलाइन बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेच्या माध्यमातून परीक्षा घेण्यात येईल. ऑनलाइन परीक्षा देण्यासाठी सुविधा उपलब्ध नसणाऱ्या विद्यार्थ्यांना अपवादात्मक परिस्थितीत ऑफलाइन परीक्षा देता येईल. परंतु त्याचे कारण विद्यार्थ्यांना गुगल फॉर्ममध्ये नमूद करावे लागेल. प्रात्यक्षिक परीक्षांसाठी कोणती पद्धत निवडावी याचा निर्णय महाविद्यालयांच्या प्राचार्यांनी घ्यायचा आहे.

**राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ**

विद्वत परिषद व परीक्षा मंडळाच्या बैठकांनंतर नागपूर विद्यापीठाच्या अंतिम वर्षाची परीक्षा १ ते १८ ऑक्टोबर दरम्यान ऑनलाइन घेण्याचा निर्णय झाला आहे. ही परीक्षा बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेच्या माध्यमातून घेतली जाणार असून एकूण ५० गुणांची परीक्षा असेल. उर्वरित ५० गुण महाविद्यालयाच्या स्तरावर दिले जातील. एका तासात विद्यार्थ्यांना दोन गुणांचा एक प्रश्न याप्रमाणे ५० प्रश्न दिले जातील. त्यातील २५ प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी द्यायची आहेत. ज्या भागात ऑनलाइन परीक्षा घेणे अशक्य असेल तिथे ऑफलाइन परीक्षांची सुविधाही दिली जाणार आहे. प्रात्यक्षिक परीक्षा १५ ते २५ सप्टेंबरदरम्यान ऑनलाइन पद्धतीनेच होतील.

- डॉ. प्रफुल्ल साबळे, संचालक, परीक्षा व मूल्यांकन मंडळ

**संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ**

अभियांत्रिकी शाखा वगळता इतर सर्व शाखांची महाविद्यालयाच्या स्तरावर लेखी परीक्षा घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांना ते शिकत असणाऱ्या महाविद्यालयात परीक्षा देता येईल. ज्यांना त्यांच्या महाविद्यालयापर्यंत पोहोचणे शक्य नाही, अशा विद्यार्थ्यांना त्यांच्या घराजवळील महाविद्यालयातून परीक्षा देण्याची मुभा दिली जाईल. दोन तासांच्या कालावधीत दहा पैकी तीन प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी लिहायची आहेत. प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन पद्धतीने १५ सप्टेंबरपासून सुरू होणार आहे. अभियांत्रिकीची परीक्षा ऑनलाइन बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेच्या माध्यमातून घेण्यात येईल.

- डॉ. मुरलीधर चांदेकर, कुलगुरू.

**गोंडवाना विद्यापीठ**

सर्व अभ्यासक्रमांची परीक्षा ऑनलाइन होणार असून ५ ऑक्टोबरपासून सुरुवात होईल. विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहिल्यास त्यांना पुन्हा एक संधी दिली जाणार आहे. बहुपर्यायी प्रश्नपत्रिकेच्या माध्यमातून दीड तासांच्या कालावधीत (९० मिनिटे) परीक्षा होणार आहेत. विद्यार्थ्यांना १० प्रश्न दिले जातील. त्यापैकी ८० प्रश्नांची उत्तरे विद्यार्थ्यांनी द्यायची आहेत. प्रत्येक प्रश्नाला एक गुण मिळणार आहे. २० गुण अंतर्गत मूल्यमापनासाठी महाविद्यालय स्तरावर दिले जातील. प्रात्यक्षिक परीक्षा १५ ते २५ सप्टेंबरदरम्यान ऑनलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहे.

**डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात दीड लाखाहून अधिक परीक्षार्थींची १ ते १५ ऑक्टोबर दरम्यान ऑनलाइन परीक्षा होणार आहे. ५० गुणांची एक तासाची परीक्षा होणार असून बहुपर्यायी प्रश्नपत्रिका काढण्यात येणार आहे. कोणी विद्यार्थी परीक्षेपासून वंचित राहणार नाही याची काळजी घेतली जाणार असून जवळच्या महाविद्यालयात किंवा महाराष्ट्र ज्ञान मंडळाच्या (एमकेसीएल) केंद्रातील सुविधेचा लाभ परीक्षार्थींना घेता यावा असे नियोजन करण्यात येत आहे. अगदीच आवश्यकता भासल्यास अपवादात्मक स्थितीत ऑनलाइन परीक्षा देता येत नसेल तर जिल्हा आपत्ती निवारण प्राधिकारी म्हणजे जिल्हाधिकाऱ्यांच्या परवानगीने परीक्षा घेण्यात येईल.

- डॉ. प्रमोद येवले, कुलगुरू

**स्वामी रामानंदतीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड**

अंतिम वर्षाच्या परीक्षा घेण्याची तयारी विद्यापीठ करत आहे. ३ ते २५ ऑक्टोबर दरम्यान सर्व विद्याशाखांच्या अंतिम वर्षाच्या होतील. विद्यार्थ्यांना ऑनलाइन आणि ऑफलाइन असे दोन्ही पर्याय खुले ठेवण्यात आले आहेत. या परीक्षेची प्रश्नपत्रिका बहुपर्यायी स्वरूपाची असेल. या विद्यापीठात विज्ञान व अन्य शाखांच्या विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा पूर्वीच घेण्यात आलेली आहे. परीक्षेच्या नियोजनासंदर्भात विद्यापीठ कार्यक्षेत्रातील प्राचार्यांची जिल्हानिहाय बैठक मंगळवारी होणार आहे.

- प्राचार्य किशोर गंगाखेडकर, सदस्य, परीक्षा मंडळ

**कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव**

अंतीम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन पध्दतीने घेणार आहे. जेथे तांत्रिक अडचणी येतील तेथे ऑफलाइन परीक्षांचा पर्याय स्वीकारला जाईल. महाविद्यालयीन स्तरावर ऑफलाईन परीक्षांची व्यवस्था करण्यात येईल. परीक्षांचे नियोजन, प्रश्नपत्रिका काढणे हे विद्यापीठ स्तरावर होईल. महाविद्यालयांना स्थानिक प्रशासन, पोलीस, आरोग्य विभागाशी समन्वय साधावा लागेल. प्रात्यक्षिक परीक्षेचे मूल्यमापन मौखिक पध्दतीने ऑनलाइन होईल. विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष बोलावले जाणार नाही. त्यांना 'पीपीटी' किंवा तत्सम ऑनलाइन माध्यमातून सादरीकरणाचा पर्याय वापरता येईल. याबाबत शासनाला सोमवारी अहवाल सादर करण्यात आला आहे, अशी माहिती विद्यापीठातील उच्चपदस्थ अधिकाऱ्यांनी दिली.

# अंतिम वर्षाची १ ऑक्टोबरपासून लेखी परीक्षा

» पान १ वरून

बॅकलॉग असणाऱ्या विद्यार्थ्यांच्या परीक्षा महाविद्यालयावरच होणार आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यापरिषदेची बैठक आज ऑनलाईन पद्धतीने झाली. यामध्ये हा निर्णय घेण्यात आला. रविवारी (ता. ६) अधिष्ठाता मंडळ, अधिकार मंडळ आणि परीक्षा विभागाची बैठक झाली होती. यामध्ये परीक्षा ऑनलाईन पद्धतीने घेण्यावर एकमत झाले. मात्र, या परीक्षा कधी आणि कशा प्रकारे घ्यायच्या, याबाबतचा अंतिम निर्णय विद्या परिषदेच्या बैठकीत होणार होता. त्याप्रमाणे आज विद्या परिषदेच्या बैठकीत हा निर्णय झाला. अंतिम वर्षांच्या परीक्षा या ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने होणार आहेत. ही परीक्षा ५० गुणांची असणार असून, सर्व प्रश्न वस्तुनिष्ठ आणि बहुपर्यायी असणार आहेत. ज्या विषयांची प्रात्यक्षिक झाली आहे, त्यांची ४० गुणांची परीक्षा होईल. १० गुण प्रात्यक्षिक परीक्षेचे असतील. ज्यांचे प्रात्यक्षिक झाले नाही, त्यांची मात्र ५० गुणांची परीक्षा होणार आहे. ऑफलाईन परीक्षांचाही पर्याय विद्यार्थ्यांना देण्यात आला असून यासाठी महाविद्यालये, शाळा तात्पुरत्या घेऊन तेथे परीक्षा होईल. परीक्षांचा कार्यक्रम लवकरच जाहीर केला जाणार आहे. ३१ ऑक्टोबरपर्यंत परीक्षा होऊन निकाल लावण्याचे आदेश यूजीसीकडून देण्यात आले आहेत.

अंतिम वर्षांचे एकूण विद्यार्थी – ७५,०००
महाविद्यालये – २९३
बॅकलॉगचे विद्यार्थी – २५,०००
विषयनिहाय प्रश्नपत्रिका – १६००
विषय – ४७५

# शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा एक ऑक्टोबरपासून

(पान १ वरुन) परीक्षा केंद्र करणार आहे. नियमित व बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांच्या परीक्षेचे सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर केले जाणार आहे. या निर्णयानुसार परीक्षा घेण्याची तयारी करण्यासाठी दोन समित्यांची नियुक्ती होणार आहे. या समित्यांमध्ये अधिष्ठाता, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष, प्राचार्य, आदींचा समावेश असेल. या विद्यापरिषदेच्या बैठकीत प्रभारी कुलगुरु डॉ. नितीन करमळकर, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे प्रभारी गजानन पळसे, अधिष्ठाता डॉ. ए. एम. गुरव, मेघा गुळवणी, एच. एन. मोरे, पंकज मेहता, आदींसह विद्या परिषदेतील ४० सदस्य सहभागी झाले.

या परीक्षेची प्रक्रिया दि. ३१ ऑक्टोबरपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश विद्यापीठ अनुदान आयोगाने दिले आहेत. ही मुदत दि. १० नोव्हेंबरपर्यंत वाढवून घेण्यासाठी प्रयत्न करण्याचा निर्णय विद्या परिषदेच्या बैठकीत घेतला.

## आकडेवारी दृष्टिक्षेपात

१) कोल्हापूर, सांगली, साताऱ्यातील एकूण महाविद्यालयांची संख्या : २९३

२) अंतिम वर्षातील विद्यार्थी : ७५ हजार

३) बॅकलॉगमधील विद्यार्थी : २५ हजार

४) ऑनलाईन पद्धतीने होणाऱ्या परीक्षा : ४७५

५) या पध्दतीनुसार होणाऱ्या पेपरची संख्या : सुमारे १६००

# अंतिम वर्षाची १ ऑक्टोबरपासून लेखी परीक्षा

## शिवाजी विद्यापीठ : ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धत; ५० मार्कांचा पेपर

कोल्हापूर, ता. ७ : शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षाच्या परीक्षा ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने होणार आहेत. प्रश्नपत्रिका ही वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाची (ऑप्शनल) असेल. ५० मार्कांची परीक्षा असून प्रात्यक्षिक झालेल्या विषयांना प्रश्नपत्रिका ४० गुणांची असणार आहे. ऑफलाईन आणि ऑनलाईन दोन्ही ठिकाणी प्रश्नपत्रिका एकच असणार असून एक तासाचा अवधी असणार आहे. १ ऑक्टोबरपासून लेखी परीक्षेस प्रारंभ होणार असून, सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर करण्यात येणार आहे. ३१ ऑक्टोबरपर्यंत निकाल लावण्याचे आव्हान विद्यापीठ प्रशासनासमोर आहे.

पान ६ वर »

### सॉफ्टवेअरचा प्रश्न

विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रश्नपत्रिका देणे, त्या तपासणे आणि त्याचे थेट गुण संबंधित शिक्षकांना देणे, ही सर्व कामे करणारे सॉफ्टवेअर असते. यामुळे प्रश्नपत्रिका तपासण्याचा वेळ वाचतो. मात्र, सध्या हे सॉफ्टवेअर शिवाजी विद्यापीठ, तसेच पुणे विद्यापीठाकडे नाही. त्यामुळे हे सॉफ्टवेअर कसे मिळवायचे. ते शासन देणार की विद्यापीठाने घ्यायचे, याबाबत चर्चा सुरू आहे.

# विद्यापीठ परीक्षा एक ऑक्टोबरपासून

## ऑफलाईन, ऑनलाईनचाही पर्याय

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

- विद्या परिषदेचा निर्णय
- १५ सप्टेंबरपासून प्रात्यक्षिक परीक्षा

शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या शेवटच्या सत्राच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन १५ सप्टेंबरपासून, तर लेखी परीक्षा १ ऑक्टोबरपासून घेण्यात येणार आहेत. सोमवारी झालेल्या शिवाजी विद्यापीठाच्या विद्या परिषदेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात झाला. परीक्षेचे वेळापत्रक विद्यापीठाकडून लवकरच जाहीर करण्यात येणार आहे.

विद्यापीठाच्या अंतिम वर्षांच्या परीक्षांबाबतचा नुकताच सर्वोच्च न्यायालयाने निर्णय दिला. त्यानंतर विद्यापीठ परीक्षा व शैक्षणिक वेळापत्रक समिती, परीक्षा मंडळ सदस्य व अधिष्ठाता यांच्या दोन बैठका झाल्या.

पान २ वर ▶

# शिवाजी विद्यापीठाच्या अंतिम सत्राच्या परीक्षा एक ऑक्टोबरपासून

## ऑनलाईन, ऑफलाईन पद्धतीने होणार : विद्या परिषदेच्या बैठकीत निर्णय

लोकमत न्यूज नेटवर्क,

**कोल्हापूर :** विविध अभ्यासक्रमांच्या अंतिम सत्राच्या शिवाजी विद्यापीठाच्या लेखी परीक्षा या ऑफलाईन आणि ऑनलाईन या दोन्ही पर्यायांच्या माध्यमातून दि. १ ऑक्टोबरपासून घेण्यात येणार आहेत. त्याला विद्यापीठाच्या विद्या परिषदेने सोमवारी मान्यता दिली. या परीक्षांतील प्रश्नपत्रिकांचे स्वरूप वस्तुनिष्ठ बहुपर्यायी राहणार आहे. परीक्षेसाठी एक तासाचा कालावधी असणार आहे.

राज्य शासनाने दिलेल्या निर्देशानुसार, अंतिम सत्राच्या परीक्षा घेण्याच्यादृष्टीने तयारी आणि परीक्षेचे स्वरूप ठरविण्यासाठी विद्या परिषदेची ऑनलाईन बैठक झाली. ज्या ठिकाणी शक्य तेथे ऑनलाईन, तर इंटरनेट, विजेची उपलब्ध नसलेल्या ठिकाणी ऑफलाईन पद्धतीने परीक्षा घेण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला. बॅकलॉगच्या विद्यार्थ्यांची परीक्षा महाविद्यालयांनी घ्यावयाच्या विद्यापीठाकडून केवळ त्यांना प्रश्नपत्रिका पुरविण्यात येणार आहे. ज्या विद्यार्थ्यांच्या प्रात्यक्षिक परीक्षा झाल्या आहेत, त्यांच्यासाठी ४० गुणांचा, तर प्रात्यक्षिक परीक्षा न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ५० गुणांचा पेपर असणार आहे. ऑफलाईन पर्यायाने परीक्षा घेण्यासाठी विविध शाळांमध्ये (पान ६ वर)

### संगणक प्रणाली घ्यावी लागणार



ऑनलाईन पद्धतीने परीक्षा घेण्यासाठी गुगल फॉर्मप्रमाणे काम करणारी संगणक प्रणाली (सॉफ्टवेअर) लागणार आहे. ती विद्यापीठाकडे सध्या नाही. ही प्रणाली स्वत: खरेदी करायची की शासनाकडून मिळवायची याबाबत विद्यापीठाकडून दोन दिवसांत निर्णय घेतला जाणार आहे.

> विद्या परिषदेच्या बैठकीत अंतिम वर्ष अथवा सत्राच्या परीक्षेबाबत झालेल्या चर्चेनुसार ही परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन या दोन्ही पद्धतीने घेण्याचे नियोजन करण्यात येत आहे. प्रात्यक्षिक परीक्षा दि. १५ सप्टेंबर, तर लेखी परीक्षा दि. १ ऑक्टोबरपासून होणार आहे.
>
> **- डॉ. विलास नांदवडेकर, कुलसचिव**

# विद्यापीठ परीक्षा एक ऑक्टोबरपासून

(पान १ वरून) विद्या परिषदेची सोमवारी कुलगुरू डॉ. नितीन करमळकर यांच्या प्रमुख उपस्थितीत ऑनलाईन बैठक झाली. परीक्षेसंदर्भात दोन समित्या नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यांच्याकडून परीक्षेबाबत सर्व गोष्टींचे नियोजन केले जाणार आहे. अंतिम वर्षांच्या परीक्षा ऑनलाईन व ऑफलाईन पद्धतीने घेतल्या जाणार आहेत. अंतिम वर्षांच्या शेवटच्या सत्राच्या २२० हून अधिक अभ्यासक्रमांच्या परीक्षांचा समावेश आहे. विद्यापीठ कार्यक्षेत्रातून ७५ हजारांहून अधिक विद्यार्थी परीक्षेला बसणार आहेत.

५० गुणांची बहुपर्यायी वस्तुनिष्ठ स्वरूपाची प्रश्नपत्रिका असेल. प्रश्नपत्रिका तयार करण्याचे काम अधिष्ठाता मंडळ, त्या-त्या विषयांचे प्राध्यापक आणि परीक्षा विभाग मिळून करणार आहेत. बॅकलॉगच्या परीक्षा घेण्याची जबाबदारी त्या-त्या महाविद्यालयांवर सोपविण्याचा निर्णय झाला आहे. केवळ परीक्षेच्या प्रश्नपत्रिका विद्यापीठ महाविद्यालयांना पुरवणार आहे. उपलब्ध शाळा, महाविद्यालयांत ऑफलाईन परीक्षा घेण्याचे नियोजन करण्यात आले. ऑनलाईन बैठकीस कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक जी. आर. पळसे यांच्यासह विद्या परिषदेचे ४० सदस्य उपस्थित होते.

## वेळापत्रक लवकरच

प्रात्यक्षिक परीक्षांचे आयोजन १५ सप्टेंबरपासून विद्यापीठातील अधिविभाग व महाविद्यालये स्तरावर विद्यापीठाच्या सूचनेनुसार करण्यात येणार आहे. लेखी परीक्षा १ ऑक्टोबरपासून घेण्यात येणार आहेत. विद्यार्थ्यांनी याप्रमाणे अभ्यासाचे नियोजन करून परीक्षेची तयारी करावी. सविस्तर वेळापत्रक लवकरच जाहीर करू, असे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी स्पष्ट केले आहे.

**अतिरिक्त वेळेची मागणी**

राज्य सरकारने अंतिम वर्षांच्या सर्व परीक्षा व त्यांचे निकाल ३१ ऑक्टोबरपर्यंत लावण्याच्या सूचना दिल्या आहेत. मात्र, कमी कालावधी आणि मनुष्यबळाचा अभाव, यामुळे १० नोव्हेंबरपर्यंत सर्व प्रक्रिया पूर्ण करण्याबाबत शासनाकडून वेळ मागितला आहे. याबाबतचे पत्र विद्यापीठाकडून ई-मेलद्वारे पाठविल्याची माहिती कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी दिली.

## सोने-चांदी भाव

| शहर | सोने १० ग्रॅ. | चांदी १ कि. |
|---|---|---|
| कोल्हापूर | ५०,८०० | ६२,५०० |
| सोलापूर | ५१,२०० | ६५,२०० |